# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४५१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२८/०७/२०१६.

## १) इलेक्ट्रीक लाइनचे लोखंडी पोलची चोरी . :—

दिनांक २०/०७/२०१६ ते २३/०७/२०१६ रोजी चे १०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी प्रसन्नजित माणीकचंद साधु वय ३३ वर्ष, रा. सुदंर नगर धंतोली नागपुर यांनी इलेक्ट्रीक बोर्डाकडुन ठेक्याने घेतलेल्या इलेक्ट्रीक तार लावण्याकरीता इलेक्ट्रीक लाइनचे लोखंडी पोल १००—११६ एमएम ९ मिटर लांबीचे १७ नग कि. १ लाख २५ हजार रु. चे पाहुणी गावातील राईसमील जवळ ठेवले असता पावसामुळे काम बंद असल्याने कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने असे फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उके पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

## २) अवैधरित्या रेतीची चोरी . :—

दिनांक २७/०७/२०१६ रोजी १४.१५ वा. दर. यातील आरोपी ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल १२९६ चा चालक याने आपल्या मालकाचे सांगण्यावरुन आपल्या ताब्यातील ट्रॅक्टरचे ट्रॉली मध्ये अवैध रित्या बिना रॉयल्टीने १ ब्रास गौन खनीज रेती कि. २,०००/रु. ची चोरुन भरुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,१०९ भादंवि. सहकलम २०७ एमव्ही ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कुंभलवार पो.स्टे. वरठी हे करीत आहे. आरोपी अटक आहे.

## ३)शुल्लक कारणावरुन डोक्यावर मारुन जखमी केले. :—

दिनांक २०/०७/२०१६ रोजी १२.०० वा. दरम्यान यातील आरोपी याने आपल्या आई श्रीमती जुनाबाई भिकाजी भेदे वय ६५ वर्ष, रा. जांभोरा हिच्या सोबत विनाकारण भांडण करुन फावडयाने तीचे डोक्यावर मारुन जखमी केले. असे फिर्यादी गजानन भिकाजी भेदे वय ४९ वर्ष, रा. जांभोरा यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३२४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—

दिनांक २८/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर, साकोली व करडी येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २१ लिटर हातभट्टी दारू कि. २,२००/रु. व २६० मि.ली. देशी दारु कि. ३५०/—रु. तसेच जुगारातुन कि. १,५७०/— रु. असा एकुण कि. ४,१२०/—रू. चा माल जप्त करण्यात आला

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता